पिंपरी चिंचवड महानगरपालिका
महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल
सूचना

क्रमांक – नरवि/कावि/३६/२३२/२०१८.

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस- १८०५/१०५०/प्र.क्र. -७९५/०५/नवि-१३, दि:- ३० मे २००८ अन्वये व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस- १८०८/८९४/प्र.क्र.- १७२७/नवि-१३, दि:- १८ ऑगस्ट २००९ अन्वये भागशः मंजूर आहे. आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका वाढीव हद्द वगळलेल्या भागाची विकास योजना ( ईपी क्र. १ ते ११८) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टीपीएस- १८१२/१६०/प्र.क्र. ५८/१२/पुनर्बांधणी क्र. २७/१२/ईपी मंजूरी/ नवि-१३, दि:- २ मार्च २०१५ अन्वये मंजूर आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली.)

आणि ज्याअर्थी,उक्त विकास योजनेत मौजे च-होली येथील स.नं. १९३ पासून स.नं. १७० पर्यत आस्तित्वातील पुर्व-पश्चिम रस्त्यास १८.०० मी. प्रमाणे रस्तारुंदीकरण प्रस्तावित आहे. (यापुढे "उक्त रस्ता" म्हणून संबोधित केलेला.)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभेने ठराव क्रमांक १५३, दि:- २८/२/२०१८ अन्वये मंजूर केलेल्या ठरावात उक्त विकास योजनेतील मौजे - च-होली येथील स.नं. १७३ व १८२ पैकी मधील विकास योजनेत दर्शविलेला व प्रत्यक्षात जागेवर असलेला आस्तित्वातील रस्ता यामध्ये तफावत असल्याने आस्तित्वात असलेल्या रस्त्यास स.नं. १७३, स.नं. १८२ तसेच स.नं.१८४ पैकी मिळकतीमधून रस्तारुंदीकरण करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये वैधानिक कार्यवाही करण्यासंबंधीचा विषय आहे. ( यापुढे "उक्त ठरावातील विषय " म्हणून संबोधिलेला.)

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील स.नं. १७३, स.नं. १८१ ते स.नं. १८६ मधील जागेवरील आस्तित्वातील रस्त्यास १८.०० मी. प्रमाणे रस्तारुंदीकरण उक्त ठरावातील विषयानुसार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्याचे योजिले आहे. ( यापुढे "उक्त फेरबदल प्रस्ताव " म्हणून संबोधित केलेला.)

आणि त्याअर्थी, उक्त फेरबदल प्रस्ताव दर्शक नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११ ०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आला आहे.

उक्त फेरबदलाबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असतील तर त्या सदरची सूचना महाराष्ट्र शासन, राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लेखी स्वरुपात आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११० १८ यांच्या कार्यालयाकडे पाठवाव्यात.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत विहित मूदतीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडे प्राप्त झालेल्या हरकती / सूचनांचा विचार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करण्यापूर्वी केला जाईल.

जाहिरात क्रमांक 232/18

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – १८

ठिकाण- पिंपरी, पुणे – १८.
दिनांक - १९ /०८/२०१८.

(टिपः- सदर सूचना व उक्त फेरबदलाचा नकाशा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर ही अवलोकनार्थ उपलब्ध आहे.)

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION

Modification u/s 37 of Maharashtra Regional and Town Planning Act 1966

Notice

No. TPS/WS/36/231/ 2018.

Whereas, the Development Plan for the extended limits of Pimpri Chinchwad Municipal Corporation has been sanctioned in parts by the Governnment of Maharashtra in Urban Development Department, vide Notification No.TPS-1805/1050/CR-795/05/UD-13, dated 30th May, 2008 and also by the Governnment of Maharashtra in Urban Development Department, vide Notification No.TPS - 1808/894/CR-1727/UD-13, dated 18th August, 2009. And whereas, the Development Plan of Excluded Part of the extended limits ( EP No. 1 to 118) has been sanctioned by the Governnment of Maharashtra in Urban Development Department, vide Notification No.TPS-1812/160/CR-58/12/Reconstruction No. 27/12/EP sanction/UD–13, dated 2nd March, 2015. ( hereinafter referred to as the "said Development Plan".)

And whereas, in the said Development Plan, road widening of 18.00 m is proposed to existing East-West road starting from S.No.193 to S.No. 170 of Charoli village ( hereinafter referred to as the " said Road.")

And whereas, the General Body of Pimpri Chinchwad Municipal Corporation has passed the resolution, vide Resolution No. 153, dated 28/2/2018 to initiate the modification procedure as laid down under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 in the said Development Plan to propose road widening to existing East-West road passing through S.No.173, S.No. 182 & S.No. 184 from Charoli village, as there is discrepancy in the existing East-West road shown in the development plan & road actually existing on site from S.No. 173 & 182 which is the subject part of this resolution. ( hereinafter referred to as the " said Subject of Resolution.")

And whereas, the Municipal Corporation intends to initiate the modification procedure as laid down under section 37 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 in the said Development Plan as per the said Subject of Resolution to propose road widening of 18.00 m to existing road from S.No. 173, S.No. 181 to S.No. 186. (hereinafter referred to as the "said Modification ".)

And therefore, the copy of the said Modification is kept open for public inspection on all working days during office hours in the office of Deputy Director of Town Planning, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune - 411 018.

Any person having any suggestion and / or objection regarding the said Modification may file the same in writing to the Commissioner, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune – 411 018 within a period of one month from the date of publication of this notice in the gazette of Maharashtra Government.

The suggestions and / or objections received within the stipulated period will be considered by the Municipal Corporation before submitting the proposal to the Government of Maharashtra for sanction.

Notice No. 232/18 (Shravan Hardikar)

Place- Pimpri, Pune -18. Commissioner ,

Date- 19/03/2018 Pimpri Chinchwad Municipal Corporation,

Pimpri, Pune-18

(Note: The said Notice & plan showing modification proposal is also available on the website of P.C.M.C. – www.pcmcindia.gov.in)

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## वाढीव हद्दीचे सुधारीत मंजुर विकास योजनेत

## महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावित फेरबदल.

## फेरबदलाचा नकाशा

( मौजे – च-होली स.नं. १९१ व १७० लगतचा रस्ता )




मंजुर विकास योजना आरक्षण

मंजुर विकास योजना रस्ते/रस्तारुंदी

रहिवास विभाग

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव
( मंजुर विकास योजनेतील १८ मी. रस्त्याने आखणीत प्रस्तावित फेरबदल असे )

**उप संचालक नगररचना**
**नगररचना व विकास विभाग**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी – १८.**

**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी, पुणे – १८**